# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १५२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## पोलीस पाटील यांचे मानधन बँक खात्यात होणार जमा

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील 23 पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कार्यरत असलेल्या ५९८ पोलीस पाटील यांचे मानधन थेट त्यांचे बँक खात्यात मिळावे, यासाठी मानधन वितरणाची प्रक्रिया सी.एम.पी. प्रणालीद्वारे अधिक सुलभ करण्यात आली असून पोलीस पाटील हे ग्रामीण पोलीस यंत्रणेचा महत्त्वाचा भाग असून, गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांबाबत माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणे तसेच पोलीस आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्याचे काम ते करतात.

## राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या दिशेने हालचाली?

**मुंबई :** राज्यात पावसाने ओढ दिलेल्या विविध भागांमध्ये दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे. पावसाची तूट असलेल्या भागांमध्ये पहिला दुष्काळ ट्रिगर लागू झाल्यानंतर आता दुसरा ट्रिगर लागू करण्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबींचे विश्लेषण सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यासाठी पीकस्थिती, जमिनीतील ओलावा, जलाशयांतील पाणीसाठा तसेच उपग्रहाद्वारे मिळणाऱ्या 'एनडीव्हीआय' (वनस्पती हिरवाई निर्देशांक) डेटाचा अभ्यास केला जाणार आहे.

# 2800 प्रशिक्षणार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न ऐरणीवर; आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कायद्याचा बडगा 20 प्रशिक्षणार्थ्यांवर गुन्हे!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज एमआयडीसीतील बजाज ऑटोच्या प्रकल्पात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांसाठी आवाज उठवला; मात्र त्यांच्या प्रश्नांवर संवाद साधण्याऐवजी आंदोलन करणाऱ्या २० प्रशिक्षणार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. तब्बल २८०० विद्यार्थी प्रशिक्षणार्थी म्हणून कंपनीशी जोडलेले असताना त्यांच्या मागण्यांकडे नेमके किती गांभीर्याने पाहिले गेले, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. भविष्य घडविण्यासाठी प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आणि त्यानंतर थेट पोलिसांत तक्रार दाखल झाली. त्यामुळे मागण्या मान्य होणार की विद्यार्थ्यांच्या वाट्याला गुन्ह्यांची नोंद येणार, असा सवाल निर्माण झाला आहे.

टिमलिज फाउंडेशनच्या माध्यमातून बजाज ऑटोच्या वाळूज प्लांटमध्ये सुमारे २८०० विद्यार्थी प्रशिक्षणार्थी म्हणून कार्यरत आहेत. कंपनी व्यवस्थापनाने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत या विद्यार्थ्यांना तीन वर्षांचे प्रशिक्षण दिले जात असल्याचे नमूद केले आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना अनुभव प्रमाणपत्र देण्यात येते. त्यामुळे या प्रशिक्षणाचा त्यांच्या पुढील रोजगाराच्या संधींशी थेट संबंध आहे. अशा परिस्थितीत आपल्या प्रश्नांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल होणे ही बाब त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने गांभीर्याने तपासण्याची गरज निर्माण करणारी आहे.

२० सप्टेंबर रोजी रविवारी पहाटे पावणेसहाच्या सुमारास प्रशिक्षणार्थ्यांनी बजाज ऑटोच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आंदोलन केले. कंपनीत कामगारांना घेऊन येणाऱ्या बसेस अडवण्यात आल्याचा, घोषणाबाजी करून गोंधळ घालण्यात आल्याचा आणि कंपनीच्या कामकाजात अडथळा निर्माण करण्यात आल्याचा आरोप कंपनी व्यवस्थापकाने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत केला आहे. या तक्रारीनंतर पोलिसांनी २० प्रशिक्षणार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

मात्र, या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांनी आंदोलन का केले? त्यांच्या मागण्या नेमक्या काय आहेत? त्या मागण्यांसाठी त्यांनी कंपनी व्यवस्थापनाशी यापूर्वी संपर्क साधला होता का? त्यांच्याशी चर्चा झाली होती का? त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी व्यवस्थापनाकडून कोणती पावले उचलण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्टपणे समोर आलेली नाहीत. कामगारांसोबतच टिमलिज फाउंडेशनमार्फत प्रशिक्षण घेणारे २८०० विद्यार्थीही या औद्योगिक व्यवस्थेचा भाग आहेत.

तक्रारीत असेही नमूद करण्यात आले आहे की, ११ ऑगस्ट रोजी प्रशिक्षणार्थ्यांनी कंपनीतील कामगारांना अडथळा निर्माण केला होता. त्या वेळी ते विद्यार्थी प्रशिक्षणार्थी असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली नव्हती, असा कंपनीचा दावा आहे. त्यानंतर २० सप्टेंबर रोजी पुन्हा कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आंदोलन झाल्याने व्यवस्थापनाने पोलिसांत तक्रार दिली.

कंपनीच्या तक्रारीनुसार आंदोलनामुळे कामगारांच्या बसेस अडवण्यात आल्या आणि कंपनीच्या कामकाजात अडथळा निर्माण झाला. तसेच आंदोलनादरम्यान कंपनीचे नुकसान झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या आरोपांच्या आधारे पोलिसांनी संबंधित प्रशिक्षणार्थ्यांविरुद्ध कारवाई केली आहे. या आरोपांची चौकशी आणि त्यामागील वस्तुस्थिती तपासण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

या प्रकरणात गणेश रमेश कावळे, प्रतिक अनिल मानकर, शुभम बाबासाहेब घोलप, जयश्री भोजराज भोंडे, दीक्षा महेंद्र वानखेडे, नाझेमा मोहम्मद शहा, नवनाथ ज्ञानेश्वर कुबेर, सागर गणेश सोनवणे, ऋतिक रत्नाकर काथार, अभंग रवींद्र दळू, विशाल नारायण बर्डे, श्रद्धा दिलीप साळुंके, विशाल विठ्ठलराव ठोबरे, भारत भाऊसाहेब डोरले, प्रिया कृष्णा भंडारी, दीपक पंढरीनाथ देवरे, प्रितम भारत जाधव, भारत नवनाथ उगले, शरद कैलास चौधरी आणि अंकिता ज्ञानेश्वर मेश्राम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक अरविंद शिंदे करीत आहेत.

कंपनीच्या कामकाजात अडथळा निर्माण झाला असेल तर त्याची कायदेशीर चौकशी होणे स्वाभाविक आहे. मात्र, या कारवाईसोबतच विद्यार्थ्यांच्या मूळ प्रश्नांवरही चर्चा होणे तितकेच आवश्यक आहे. कारण या प्रकरणात केवळ २० विद्यार्थ्यांचा प्रश्न नाही; तब्बल २८०० प्रशिक्षणार्थ्यांच्या भवितव्याशी हा विषय जोडलेला आहे. प्रशिक्षणाच्या काळात विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल झाल्यानंतर त्याचा त्यांच्या पुढील संधींवर काय परिणाम होईल, याचाही विचार होणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांनी आंदोलन केले म्हणून त्यांचे म्हणणे संपत नाही आणि कंपनीने तक्रार दिली म्हणून विद्यार्थ्यांच्या मागण्याही संपत नाहीत. कायद्याची प्रक्रिया तिच्या मार्गाने सुरू राहील; पण विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संवादाचे दारही उघडले पाहिजे. तीन वर्षांचे प्रशिक्षण घेऊन भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्तर म्हणून जर गुन्ह्यांचे कागद हातात दिले जात असतील, तर त्यांच्या मनातील अस्वस्थता आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे या आंदोलनामागील मूळ कारण काय, विद्यार्थ्यांच्या मागण्या काय आणि त्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी कंपनी व्यवस्थापन पुढाकार घेणार का, याचे उत्तर आता बजाज प्रशासनाला आणि संबंधित यंत्रणांना द्यावे लागणार आहे. कारण कंपनीचे गेट अडवणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई करणे सोपे असेल; पण त्यांच्या मनात निर्माण झालेला प्रश्न सोडविणे हीच खरी कसोटी आहे.

## थोडक्यात वार्ता

### पेपरफुटी प्रकरण; 2 फरार आरोपी अटकेत, सर्व गजाआड

**बीड :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणात फरार असलेल्या दोन मुख्य संशयित आरोपींना बीड आणि बिहार येथून अटक करण्यात आली आहे. प्रकाश मिसाळ आणि अशोक साव अशी या अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या दोघांच्या अटकेमुळे चार्जशीटमध्ये नाव असलेल्या सर्व १८ आरोपींना आता पोलिसांनी गजाआड केले आहे.

पोलिसांच्या सखोल तपासातून महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्ली या राज्यांमध्ये पसरलेले एक मोठे आंतरराज्यीय परीक्षा घोटाळा असल्याचे उघड झाले. विशेष तपास पथकाने कसून शोध घेत प्रकाश मिसाळ आणि अशोक साव या दोघांनाही अटक केली.

२८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेच्या एक दिवस आधी हा गैरप्रकार समोर आला होता. भिवंडीतील एका रहिवाशाला प्रश्नपत्रिका विकण्याचा प्रयत्न तीन जण करत असल्याची गुप्त पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी कोणगाव परिसरात डमी ग्राहकांच्या मदतीने सापळा रचला आणि संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे प्रश्नपत्रिकेचे चार सेट मिळाले.त्यानंतर पोलिसांनी त्या प्रश्नपत्रिका महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून तपासून घेतल्या. जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिका मूळ प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळत असल्याचे समोर आले.

### आरोग्यसेवा शिक्षणात राष्ट्रीय अभ्यासक्रम यंदा होणार लागू

**मुंबई :** राज्यातील सहयोगी आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि नियमन अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र राज्य सहयोगी व आरोग्यसेवा परिषदे'च्या कामकाजाला गती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर परिषदेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, राष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

सहयोगी आरोग्यसेवा क्षेत्रातील शिक्षणाचा दर्जा, व्यावसायिक मानके आणि सेवांचे नियमन यासाठी ही परिषद काम करणार आहे. संस्थांचे मूल्यांकन, व्यावसायिकांची राज्यस्तरीय नोंदणी तसेच आधुनिक वैज्ञानिक प्रगतीचा आरोग्यसेवेत स्वीकार यांचाही परिषदेच्या कार्यक्षेत्रात समावेश आहे. आरोग्यसेवा क्षेत्रातील शिक्षण आणि कामकाजात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी परिषदेअंतर्गत चार स्वायत्त मंडळे स्थापन करण्यात येणार आहेत. त्यामध्ये पदवीपूर्व सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, पदव्युत्तर सहयोगी व आरोग्यसेवा शिक्षण मंडळ, सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय मूल्यांकन व मानांकन मंडळ तसेच सहयोगी व आरोग्यसेवा व्यवसाय आचारसंहिता व नोंदणी मंडळ यांचा समावेश आहे.

### सोनिया गांधी यांच्या अडचणीत वाढ, 1980 सालच्या वोटर लिस्टमधील नाव अंगलट येणार

नवी दिल्ली : काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे. भारतीय नागरिक होण्याआधीच त्यांच नाव मतदार यादीत असल्याने अडचणीत येण्याची शक्यता आहे. 1983 साली भारतीय नागरिक होण्याच्या तीन वर्षाआधीच त्यांचं नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले होते. यावरून बराच वाद रंगला होता. त्यानंतर या आरोपांची चौकशी करण्यास नकार देणारा निर्णय दंडाधिकारी न्यायालयाने दिला होता. मात्र आता या निर्णयाविरुद्ध राउस एव्हेन्यू विशेष न्यायालयाने आक्षेप नोंदवला आहे. तसेच या प्रकरणाची सुनावणी नव्याने घेण्याचे आदेश दिले आहेत. दंडाधिकारी न्यायालयाच्या आदेशात योग्य खबरदारीचा अभाव दिसून आल्याचं निरीक्षण विशेष न्यायाधीशांनी सुनावणीत नोंदवलं आहे.

# जिंतूरात बंजारा आंदोलनाला पुन्हा हिंसक वळण!

## उपोषणकर्ते विनोद आडे यांचा आत्मदहनाचा प्रयत्न; वाहनांची तोडफोड






**जिंतूर:** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी जिंतूर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला सोमवार, २१ सप्टेंबर रोजी अचानक हिंसक वळण लागले. मागील अनेक दिवसांपासून उपोषण करणारे आंदोलक विनोद आडे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने आंदोलनस्थळी एकच खळबळ उडाली. त्यानंतर संतप्त आंदोलकांनी अचानक रस्त्यावर उतरून रास्ता रोको केला. यावेळी आयशर ट्रक, ऑटो आणि स्कूल व्हॅनची तोडफोड करण्यात आल्याने शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी विनोद आडे हे गेल्या अनेक दिवसांपासून उपोषण करीत आहेत. शासनाने मागणीबाबत ठोस निर्णय घ्यावा, या मागणीसाठी आंदोलनाची तीव्रता वाढत आहे. सोमवारी आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने समाजबांधव जमले असताना विनोद आडे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले.

या घटनेनंतर आंदोलनस्थळी मोठा गोंधळ निर्माण झाला आणि काही वेळातच आंदोलकांनी रस्त्यावर उतरून अचानक रास्ता रोको सुरू केला.

यावेळी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात असतानाही आंदोलकांनी वाहतूक रोखल्याने रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांची धावपळ उडाली. दरम्यान, संतप्त आंदोलकांकडून रस्त्यावर असलेल्या आयशर ट्रक, ऑटो तसेच एका स्कूल व्हॅनची तोडफोड करण्यात आली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे वाहनचालक, नागरिक आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान आंदोलनाला हिंसक वळण लागल्याची माहिती शहरात पसरताच व्यापाऱ्यांमध्येही मोठी घबराट निर्माण झाली. संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी अनेक व्यापाऱ्यांनी दुकाने घाईघाईने बंद केली. त्यामुळे काही काळ बाजारपेठेत शुकशुकाट पसरला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने मोठा बंदोबस्त तैनात केला असतानाही अचानक रास्ता रोको आणि वाहनांची तोडफोड झाल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत असताना, सोमवारी घडलेल्या या प्रकारामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. आंदोलकांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी होत असतानाच सार्वजनिक रस्ते अडविणे आणि वाहनांची तोडफोड करण्याच्या प्रकारामुळे शहरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

तोडफोड आणि रास्ता रोकोच्या घटनेप्रकरणी पोलिसांकडून पुढील काय कार्यवाही होते, याकडे लक्ष लागले आहे. सध्या शहरातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्त कायम ठेवण्यात आला आहे.

# माजी आ. नामदेवराव पवार यांच्या नेतृत्वाखाली पिशोर नाक्यावर आंदोलन

## शेतकऱ्यांसाठी सरसकट 50 हजारांच्या अनुदानाची मागणी



**कन्नड :** दि.२१ सप्टेंबर - तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरून माजी आमदार नामदेवराव पवार यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी पिशोर नाका येथे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्य सरकारच्या धोरणांवर निशाणा साधत कन्नड तालुका दुष्काळग्रस्तांच्या यादीतून का वगळण्यात आला, असा सवाल उपस्थित करण्यात आला. शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन मंडळ अधिकारी यांनी स्वीकारले.

कन्नड तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक संकटे, पीक नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींमुळे त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत तालुक्याला दुष्काळग्रस्तांच्या यादीतून वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांना दिलासा कसा मिळणार, असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, कन्नड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्यानुसार नुकसानभरपाई द्यावी, सरसकट ५० हजार रुपये अनुदान द्यावे, वाढत्या महागाईवर नियंत्रण आणावे, चारा छावण्या सुरू करून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, तसेच २०२५ मधील शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान व विम्याचे पैसे तातडीने द्यावेत, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविणे सुरूच राहील, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

या आंदोलनात माजी आमदार नामदेवराव पवार, गणेश शिंदे, नगराध्यक्ष फरीनबी अब्दुल जावेद, नगरसेवक अब्दुल जावेद, अयाज शाह, भाऊसाहेब पवार, प्रकाश बारगळ, प्रभाकर काकडे, असद पठाण, सुमित्रा आव्हाळ, अब्दुल याकूब, बाबासाहेब मुरकुंडे, भागीनाथ इघे, आणि मुक्तार खान यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# हदगावमध्ये एकाच रात्री नऊ दुकाने फोडली; व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**हदगाव, दि.२१ सप्टेंबर :** शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घालत एकाच रात्री तब्बल नऊ दुकाने फोडल्याची घटना शनिवारी-रविवारी (दि. १९ ते २० सप्टेंबर) मध्यरात्री घडली. श्रीधरनगर येथील श्री साई कॉम्प्लेक्समधील सात दुकाने, नांदेड रोडवरील चव्हाण बिअर शॉपी आणि बसस्थानकाजवळील देशी दारूचे दुकान फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह एकूण १ लाख ८ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेमुळे हदगाव शहरात व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुकृपा झेरॉक्स मल्टी सर्व्हिसेसचे चालक राजू शिवाजी कदम (वय ४२, रा. कमलाईनगर, हदगाव) यांनी याबाबत हदगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. कदम यांनी १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता दुकान बंद करून घर गाठले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे ७.१० वाजता शेजारील दुकानदार संदीप करडखेले यांनी फोन करून श्री साई कॉम्प्लेक्समधील अनेक दुकाने फोडल्याची माहिती दिली. त्यानंतर कदम यांनी घटनास्थळी धाव घेतली असता त्यांच्या दुकानासह कॉम्प्लेक्समधील सात दुकानांचे शटर वाकवून चोरी झाल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, नांदेड रोडवरील शिवपार्वती मंगल कार्यालयाजवळील चव्हाण बिअर शॉपी तसेच बसस्थानकाजवळील अवधुत माधवराव शिंदे यांच्या देशी दारूच्या दुकानातही चोरी झाल्याचे समोर आले. दुकानदारांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मध्यरात्री १२ ते पहाटे ३ वाजेच्या दरम्यान तीन अज्ञात चोरटे दुकानांमध्ये चोरी करताना दिसून आले. त्यामुळे पोलिसांसमोर आता या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. श्री साई कॉम्प्लेक्समधील गुरुकृपा मल्टी सर्व्हिसेसमधून ४० हजार रुपये, गजानन मल्टी सर्व्हिसेसमधून ३० हजार रुपये, सूर्यवंशी मल्टी सर्व्हिसेसमधून ८ हजार रुपये, मल्टी सर्व्हिसेस झेरॉक्समधून ५ हजार रुपये, श्री श्याम मल्टी सर्व्हिसेसमधून ५ हजार रुपये, लक्ष्मीनारायण दुकानातून ४ हजार रुपये आणि बळिराजा मल्टी सर्व्हिसेसमधून ४ हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेली.

"शाल जोडे"




# फर्दापूर बस स्टॉपवर एसटी चालकाची दादागिरी वयोवृद्ध प्रवाशाला चक्क दगड उचलून मारहाणीचा प्रयत्न

**फर्दापूर :** सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या एसटी महामंडळाच्या MSRTC काही कर्मचाऱ्यांची मुजोरी आता कहर करत आहे फर्दापूर बस स्टॉपवर सोमवारी सकाळी चक्क एका एसटी चालकाने भररस्त्यात गुंडगिरी करत एका वयोवृद्ध व्यक्तीवर दगड उगारल्याची आणि अश्लील शिवीगाळ केल्याची अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक घटना उघडकीस आली आहे या घटनेमुळे एसटी महामंडळाचे कर्मचारी प्रवाशांचे 'सेवक' आहेत की गुंड असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे

भर बस स्टॉपवर चालकाचा गुंडाराज

मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी सकाळी ठीक १० वाजता फर्दापूर बस स्टॉपवर छत्रपती संभाजीनगर–पाचोरा मार्गावर धावणारी बस क्र. MH-20-BL-3281 आली यावेळी काही कारणावरून बसमधील चालकाचा एका वृद्ध व्यक्तीसोबत वाद झाला वादाचे पर्यावसान इतक्या टोकाला गेले की या उद्दाम चालकाने स्वत च्या सीटवरून खाली उतरत थेट रस्त्यावरचा एक मोठा दगड उचलला आणि तो त्या वयोवृद्ध व्यक्तीच्या अंगावर उगारला! सार्वजनिक ठिकाणी प्रवाशांच्या



गजबजाटात एका चालकाने अशी गुंडगिरी करणे हा एसटी प्रशासनाच्या प्रतिमेवर मोठा डाग आहे

वयाचाही आदर नाही शिविगाळीने परिसर हादरला

या चालकाने केवळ दगडच उगारला नाही तर त्या वयोवृद्ध व्यक्तीला अत्यंत अश्लील आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळही केली तुझे वय काय आणि तू बोलतोय काय या साध्या संस्कृतीचाही विसर या चालकाला पडला चालकाच्या या रागीट आणि हिंसक पावित्र्यामुळे बस स्टॉपवर उपस्थित असलेल्या महिला लहान मुले आणि इतर प्रवाशांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली होती काही काळ तर तिथे तणावाचेच वातावरण होते एका वयोवृद्ध नागरिकाला मारहाण करायला धावणाऱ्या या चालकाला एवढा माज आणि मुजोरी आली कुठून

प्रशासनाची कारवाई होणार की नुसतीच बघ्यांची भूमिका

एसटी महामंडळ प्रवाशांच्या जिवावर चालते पण जर महामंडळाचे चालकच प्रवाशांवर दगड उगारून त्यांचे जीव घेण्यावर टपले असतील तर प्रवाशांनी सुरक्षेसाठी कुणाकडे पाहायचे या भयंकर घटनेनंतर संतप्त नागरिकांनी या चालकावर कठोर कारवाईची मागणी उचलून धरली आहे एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आगार प्रमुख आणि पोलिसांनी या घटनेची तात्काळ दखल घ्यावी बस MH-20-BL-3281वरील या उद्दाम चालकाची तातडीने चौकशी करून त्याला निलंबित करावे जर या मुजोर चालकाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाला तर प्रवाशांचा रोष प्रशासनाला महागात पडेल असा कडक इशारा आता संतप्त नागरिकांकडून देण्यात येत आहे

एसटी प्रशासनाने या घटनेवर तातडीने खुलासा करावा आणि प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे नसल्याचे सिद्ध करावे

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## सणासुदीच्या काळात भेसळयुक्त अन्नपदार्थांचा कोट्यवधींचा साठा जप्त

अन्न व औषध प्रशासनाकडून मुंबई, पुणे, कोकणसह इतरत्र महाराष्ट्रामध्ये धडक कारवाई करण्यात आली आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न विभागाकडून १.३६ कोटी रुपयांचा धडक कारवाई करत संशयास्पद, भेसळयुक्त आणि अस्वच्छ खवा, मावा, पेढा, तूप, तेल, बर्फी, जर्दाळू, मनुका, गूळ, मिठाई आणि इतर दुग्धजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. राज्यभर एकूण ६४ हॉटेल, रेस्टॉरंट, धाबा इत्यादींच्या तपासणी करून १२ अन्न आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर, ३६ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली आहे. अन्नपदार्थ पान मसाला, गुटखा विक्री, वितरण, वाहतूक प्रकरणी प्रथम खबरी अहवालाप्रकरणी १४ गुन्ह्यांमध्ये १५ व्यक्तींना अटक करून एक कोटी ३८ लाख ७४ हजार ४३ रुपये किमतीचा साठा जप्त केला. सणासुदीचे दिवस लक्षात घेता नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि भेसळमुक्त अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत या उद्देशाने अन्न व औषध प्रशासनाने (FDA) राज्यभरात विशेष तपासणी आणि धडक कारवाईची मोहीम राबवली आहे. या मोहिमेअंतर्गत विविध भागांतून निकृष्ट दर्जा, भेसळ, विनापरवाना विक्री, अस्वच्छता आणि लेबल उल्लंघनाच्या संशयावरून अन्नपदार्थांचा साठा जप्त आणि नष्ट करण्यात आला आहे. ३२५ हजार ०२३.०१५ किलोचा एकूण साठा जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेल्या एकूण साठ्याची किंमत एक कोटी ३६ लाख २० हजार ७३५ रुपये इतकी आहे. मुंबई, पुणे, कोकण, नाशिक, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रामध्ये कारवाई केली आहे. कारवाई दरम्यान, जप्त केलेल्या खवा, मावा, पेढा, तूप, तेल, बर्फी, जर्दाळू, मनुका, गूळ, मिठाई आणि इतर दुग्धजन्य पदार्थांचा समावेश आहे. तसेच मुंबईतील १० आस्थापनांचे परवाने किंवा नोंदणी प्रमाणपत्र तात्काळ निलंबित केले आहे. यामध्ये मुंबई, मालाड, कांदिवली, अंधेरी, चेंबूर, घाटकोपर परिसरातील हॉस्पिटल्सचा समावेश आहे. शिवाय, पुण्यातील २ अन्न आस्थापनांचेही परवाने निलंबित केले आहे. गुटखा, पान मसाला आणि सुगंधित तंबाखू या प्रतिबंधित पदार्थांवरही कारवाई करण्यात आली आहे. मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागामध्ये ही धडक कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करत काही विभागांमध्ये आरोपींनाही बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. शिवाय दुकानांच्या शटरलाही टाळे ठोकण्यात आलं आहे. महाराष्ट्रामध्ये दररोज अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई केली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याचे हित साधत ही कारवाई केली जात आहे.

## अन्नातील भेसळ ओळखा, घरचे ताजे अन्न खा - सह आयुक्त दयानंद पाटील यांचे आवाहन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित 'लोकसंवाद २०२६' कार्यक्रमांतर्गत आज सिडकोतील गुलमोहर गणपती मंडळ येथे जनजागृती सत्र पार पडले. यावेळी अन्न व औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त दयानंद पाटील यांनी उपस्थित गणेश भक्तांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. बाहेर मिळणारे खाद्यपदार्थ भेसळयुक्त असू शकतात, त्यामुळे नागरिकांनी त्याबाबत नेहमी जागरूक राहिले पाहिजे, असे प्रतिपादन सह आयुक्त दयानंद पाटील यांनी केले. चव किंवा फॅशनच्या नादात नागरिक नकळत प्रकृतीला हानिकारक पदार्थांचे सेवन करतात, ज्यामुळे आरोग्याची मोठी हानी होते. यावर उपाय म्हणून प्रत्येकाने आईने बनवलेले पौष्टिक, स्वच्छ आणि सकस घरचे अन्नच सेवन केले पाहिजे, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. तसेच, अन्नपदार्थांमधील भेसळ घरबसल्या कशी ओळखावी, याबाबतची सविस्तर माहिती मिळवण्यासाठी नागरिकांनी 'Eat Right' या शासनाच्या पोर्टलला भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाचे अनिल परदेशी, भगवान ढाकरे तसेच गुलमोहर गणपती मंडळाचे पदाधिकारी तेजस व्यवहारे, अनिकेत कदम, दीपक अरोरा, तेजस कोलते, पार्थ पाटील आणि सदस्य नलिनी कुलकर्णी, श्वेता कदम, प्रभावती कदम, प्रतिमा शेळके आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## राममंदिर आंदोलनातील योगदानाला उजाळा; 27 सप्टेंबरला अशोकजी सिंघल स्मृती वंदन सभा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विश्व हिंदू परिषदेचे आद्य राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दीनिमित्त छत्रपती संभाजीनगरात रविवार, दि. २७ सप्टेंबर रोजी 'राममंदिर योद्धा स्मृती वंदन सभा' आयोजित करण्यात आली आहे. संत एकनाथ रंग मंदिर सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात अशोकजी सिंघल यांच्या कार्याला उजाळा देण्यात येणार आहे.

अशोकजी सिंघल यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून कार्याला सुरुवात केली. पुढे विश्व हिंदू परिषदेचे कार्य देशभर विस्तारण्यासह त्याला जागतिक स्वरूप देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मुक्तीसाठी उभारण्यात आलेल्या व्यापक आंदोलनातही त्यांचे योगदान राहिले. हिंदू समाजाच्या विविध क्षेत्रांत सेवाकार्य उभे करण्यासाठी त्यांनी आयुष्य समर्पित केले.

जन्मशताब्दी वर्षानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, संघटना व समाजासाठी कार्य करणाऱ्या सेवकांचा तसेच हिंदू समाजासाठी विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या सेवाभावी व्यक्तींचा गौरव करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगरातील कार्यक्रमासाठी विविध पंथ व संप्रदायांतील धर्मगुरू, संत-महंत तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय उपाध्यक्ष हुकूमचंदाजी सवला हे प्रमुख वक्ते असून, परमपूज्य भास्कर गिरी महाराज यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशोकजी सिंघल यांचा कार्यप्रवास, श्रीराम जन्मभूमी आंदोलनातील योगदान आणि त्यांच्या कार्यातून मिळणारी प्रेरणा यावर यावेळी मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यक्रमासाठी शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची स्वागत समिती गठित करण्यात आली असून, हिंदू समाजातील धर्मगुरू, संत-महंत तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागत समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठवाड्यात पाणीटंचाई उद्भवू नये यासाठी सूक्ष्म नियोजन करा : मेघना साकोरे-बोर्डीकर



हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** मराठवाड्यात यंदा सरासरीच्या तुलनेत पर्जन्यमान कमी झाले असून संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर व गावनिहाय नियोजन करावे. नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा नियमित व सुरळीत पुरवठा होईल यासाठी आवश्यक उपाययोजनांचे आतापासूनच सूक्ष्म नियोजन करावे. तसेच प्रलंबित पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी मराठवाड्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, पर्जन्यमान, उपलब्ध पाणीसाठा, संभाव्य टंचाई तसेच विविध पाणीपुरवठा योजनांचा विभागीय आढावा घेतला. यावेळी अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, अपर आयुक्त ( महसूल ) रिता मैत्रेवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सहसचिव गीता कुलकर्णी यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे पाणीटंचाई कृती आराखडा तसेच आगामी काळात करावयाच्या अपेक्षित कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती दिली.

मराठवाड्यात सरासरीच्या ६३.४० टक्के पर्जन्यमान

जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत मराठवाड्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ६७९.५० मि.मी. असून आतापर्यंत ४३०.८० मि.मी. पाऊस झाला आहे. हे प्रमाण सरासरी वार्षिक पर्जन्यमानाच्या ६३.४० टक्के आहे. या कालावधीत अपेक्षित पर्जन्यमान ६२९.७० मि.मी. असून त्याच्या तुलनेत प्रत्यक्ष पर्जन्यमान ६८.४१ टक्के आहे.

जिल्हानिहाय छत्रपती संभाजीनगरमध्ये ४२२.३० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ७२.६० टक्के, जालना ४३८.५० मि.मी. म्हणजे ७२.७१ टक्के, बीड ३३१.३० मि.मी. म्हणजे ५८.५२ टक्के, लातूर ३५१.७० मि.मी. म्हणजे ४९.८२ टक्के, धाराशिव ३३७.९० मि.मी. म्हणजे ५६.०३ टक्के, नांदेड ५८७.८० मि.मी. म्हणजे ७२.१८ टक्के, परभणी ४२०.७० मि.मी. म्हणजे ५५.२६ टक्के आणि हिंगोली जिल्ह्यात ५४३.४० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ६८.३३ टक्के पर्जन्यमान झाले आहे.

**छत्रपती संभाजीनगर विभागात सध्या चारा टंचाई नाही :** छत्रपती संभाजीनगर विभागात ६ लाख ५० हजार २८२ लहान, २६ लाख ४५ हजार ७२६ मोठी आणि २० लाख ६३ हजार ४५५ शेळी-मेंढी अशी एकूण ५३ लाख ५९ हजार ४६२ पशुधन संख्या आहे. या पशुधनासाठी दररोज सुमारे २० हजार १२५ मेट्रिक टन चाऱ्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत विभागात ४४ लाख ८१ हजार १३६.८५१ मेट्रिक टन चारा उपलब्ध असून सध्या चारा छावणीची आवश्यकता नाही.

सध्या उपलब्ध चारा जिल्हानिहाय साधारणतः ८९ ते २१० दिवस पुरेल एवढा आहे. जालना जिल्ह्यात सर्वात कमी ८९ दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध आहे. विभागात डिसेंबर २०२६ पासून चारा टंचाई जाणवण्याची शक्यता लक्षात घेऊन आतापासून नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रब्बी पिकांची लागवड कमी झाल्यास जिल्ह्यातील चारा टंचाई पुढे ढकलली जाऊ शकते. उपलब्ध चाऱ्यामध्ये खरीप व रब्बी हंगामातील चारा, बांधावरील, पडीक जमीन क्षेत्रावरील तसेच वनक्षेत्रातील चाऱ्याचा समावेश आहे.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन गावनिहाय कृती आराखडा तयार ठेवावा, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, उपलब्ध जलस्रोतांचे योग्य व्यवस्थापन करावे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी जलस्रोत सज्ज ठेवावेत, अशा सूचना दिल्या.

पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे गतीने पूर्ण करावीत. पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे. पाणीटंचाईसोबतच पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याच्या उपलब्धतेवरही सातत्याने लक्ष ठेवावे. संबंधित सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयातून संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी पूर्वतयारी करावी, असे निर्देशही राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

# वैद्यकीय शिक्षण संशोधनाला बळ देण्यात करता दस्तापुरकर महाराजांचे मरणोत्तर देहदान

## अच्युत महाराज दस्तापुरकर यांच्या संमतीने व मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांचा पुढाकार



हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

परभणी परभणी जिल्ह्याला अनेक साधुसंतांचा सहवास लाभला आहे व जगभरात गाजणारे अनेक साधुसंत परभणी जिल्ह्यातूनच निर्माण झाले आहेत परभणी ची ओळखच साधू संतांची भूमी म्हणून आहे आणि त्यांचा वारसा समोर चालू ठेवण्याकरिता माणुसकीचा आणि सामाजिक भान जपणारा प्रेरणादायी आदर्श परभणी जिल्ह्यात समोर आला आहे दस्तापुर येथील रहिवासी ह भ प राम महाराज दळवे दस्तापूरकर वय 55 वर्षे यांच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेला आणि सामाजिक मूल्यांना मान देत ग्रामस्थांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात परभणी येथे मरणोत्तर देह दान सुपूर्द केला.

हे देहदान अच्युत महाराज दस्तापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त दस्तापुर ग्रामस्थ च्या वतीने पार पडले अध्यात्मिक आणि समाजकारणाची ग्रामस्थांनी घेतलेले या निर्णयामुळे वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी मोठा आधार मिळणार आहे हे देहदान संकल्पना जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत पार पडले शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर विश्वजीत पवार जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर नागेश लखमावार अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सारिका बडे यांच्या वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालयातील सर्व प्राध्यापक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते दस्तापुरकर यांच्या निधनाने दस्तापुर गावात शोक काळा पसरली असली तरी त्यांच्या पश्चात ग्रामस्थांनी घेतलेल्या या या दूरदृष्टी व पुरोगामी निर्णयाने सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे कैलासवासी राम महाराज यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी प्रार्थना करत दस्तापुर ग्रामस्थां च्या निर्णयाचे अभिनंदन केले आहे

देहदानबाबत दिवसे दिवस जनजागृती वाढत आहे सेवा संकल्प अभियानांतर्गत मरणोत्तर देहदानाच्या स्वीकार करणे हा समाज समाजात घडणाऱ्या सकारात्मक बदलाचा मोठा संकेत आहे असे प्रतिपादन जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर नागेश लखमावार त्यांनी केले तर देहदान ही जगातील सर्वश्रेष्ठ दान आहे एका देह दानातून शेकडो भावी डॉक्टर वैद्यकीय शिक्षण पूर्ण करतात आणि हजारो रुग्णाचे प्राण वाचवण्यास सक्षम होतात दस्तापुरकर महाराजांनी घेतलेला हा निर्णय अत्यंत कौस्तुकस्पद असून संपूर्ण समाजासाठी मार्गदर्शक ठरेल अशा भावना डॉक्टर विश्वजीत पवार अधिष्ठाता शासकीय महाविद्यालय परभणी यांनी याप्रसंगी व्यक्त केले

# कुटुंबाची जबाबदारी सांभाळत हाणमंत कमळेंची पीएचडीला गवसणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील गागलेगाव या छोट्याशा खेड्यातील कष्टकरी कुटुंबातून आलेल्या हाणमंत विठ्ठलराव कमळे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अर्थशास्त्र विषयात पीएचडी संपादन केली. वडील पारंपरिक मेंढपाळ व्यवसायात, मोठा भाऊ शेतीत राबणारा आणि आई गृहिणी असताना उच्च शिक्षणाची वाट निवडत त्यांनी हे यश मिळविले. विशेष म्हणजे, पत्नी जम्मू येथे बीएसएफमध्ये देशसेवेचे कर्तव्य बजावत असताना अवघ्या तीन वर्षांच्या मुलाच्या संगोपनाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली.

डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कमळे यांनी 'मराठवाड्यातील पंचायत समितीच्या उत्पन्न आणि खर्चाचा चिकित्सक अभ्यास - कालखंड २००४-०५ ते २०१४-१५' या विषयावर संशोधन पूर्ण केले. त्यांच्या संशोधनाची दखल घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना अर्थशास्त्र विषयात पीएचडी पदवी प्रदान केली. कमळे यांच्या यशाबद्दल विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. चंद्रकांत कोकाटे, डॉ. पुरुषोत्तम देशमुख, डॉ. सुनील नरवडे, डॉ. अशोक पवार, डॉ. के. व्ही. खंदारे, डॉ. धनश्री महाजन, डॉ. विठ्ठल फुलारी, पिराजी कमळे तसेच आई मोहनाबाई, वडील विठ्ठलराव कमळे, मित्रपरिवार व नातेवाइकांनी अभिनंदन केले.

# 'जयंती-2': शिक्षणाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या सामाजिक वास्तवाचा आरसा!

## आरक्षण, जातीय विषमता आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांना भिडणारा चित्रपट ; मनोरंजनापलीकडे जाऊन आत्मपरीक्षणाची संधी देणाऱ्या कलाकृतीचे महत्त्व




शिक्षण म्हणजे माणसाच्या आयुष्याला दिशा देणारे परिवर्तनाचे साधन. शिक्षणाच्या माध्यमातून माणूस केवळ अक्षरज्ञान मिळवत नाही, तर तो प्रश्न विचारायला, अन्यायाविरुद्ध उभे राहायला आणि स्वतःचे अस्तित्व सिद्ध करायला शिकतो. मात्र शिक्षणाच्या याच मंदिरात जात, आर्थिक परिस्थिती, सामाजिक पार्श्वभूमी आणि आरक्षणाच्या मुद्द्यावरून भेदभाव होत असेल, तर त्या व्यवस्थेच्या मूलभूत उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. 'जयंती-२' हा चित्रपट याच अस्वस्थ करणाऱ्या वास्तवाला भिडतो. हा केवळ महाविद्यालयीन जीवनाची कथा सांगणारा चित्रपट नाही, तर आधुनिक शिक्षण व्यवस्थेतील सामाजिक विषमता, जातीय पूर्वग्रह, संस्थात्मक अन्याय आणि सामाजिक न्यायाच्या संघर्षाचे चित्रण करणारी कलाकृती आहे. चित्रपटाच्या माध्यमातून मांडण्यात आलेले प्रश्न केवळ पडद्यावर घडत नाहीत, ते आपल्या आजूबाजूच्या समाजातही वेगवेगळ्या स्वरूपात जिवंत आहेत. दिग्दर्शक शैलेश नरवाडे यांनी या विषयाला हात घालताना केवळ भावनिक कथानकावर विसंबून न राहता, शिक्षण व्यवस्थेतील गुंतागुंतीचे सामाजिक संदर्भ मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ऋतुराज वानखेडे, प्रियदर्शिनी इंदलकर, पायल जाधव, विजय निकम, रोहिणी हट्टंगडी, देविका दप्तदार आणि अन्य कलाकारांनी साकारलेल्या भूमिका या चित्रपटाच्या आशयाला बळकटी देतात.

चित्रपटाची कथा महाविद्यालयीन शिक्षणाचे स्वप्न घेऊन पुढे येणाऱ्या आदिवासी तरुणीच्या संघर्षाभोवती फिरते. शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्य बदलण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या या विद्यार्थिनीला महाविद्यालयीन वातावरणात जातीय भेदभाव, सामाजिक पूर्वग्रह आणि संस्थात्मक दबावाला सामोरे जावे लागते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवल्यानंतर तिच्यावर कारवाई होते. चौकशी, निलंबन आणि त्यानंतर उभा राहणारा संघर्ष हा केवळ एका विद्यार्थिनीचा वैयक्तिक प्रश्न राहत नाही, तर तो संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या संवेदनशीलतेची परीक्षा ठरतो. 'आवाज उठवणाऱ्यालाच शिक्षा आणि अन्याय करणाऱ्याला संरक्षण, अशी व्यवस्था किती काळ चालणार?' हा प्रश्न चित्रपटाच्या कथानकातून प्रेक्षकांसमोर उभा राहतो. महाविद्यालयीन परिसरातील राजकारण, संस्थात्मक दबाव आणि सामाजिक ओळखींचा शिक्षणाच्या संधींवर होणारा परिणाम या बाबींचे चित्रण चित्रपटात केले आहे. त्यामुळे 'जयती २' ही केवळ मनोरंजनासाठी पाहण्याची कलाकृती न राहता, शिक्षणव्यवस्थेचे सामाजिक परीक्षण करणारी कथा ठरते.

आज आरक्षण हा विषय राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. आरक्षणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात विविध भूमिका मांडल्या जातात. मात्र या चर्चेत आरक्षणाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आणि सामाजिक विषमतेच्या वास्तवाचा अनेकदा विसर पडतो. 'जयंती-२' या चित्रपटाचे वैशिष्ट्य असे की, तो आरक्षणाकडे केवळ राजकीय मागणी किंवा सामाजिक वाद म्हणून पाहत नाही. 'जयंती-२' मधील ऐतिहासिक अन्याय, शैक्षणिक संधींची असमानता आणि सामाजिक प्रतिनिधित्वाची गरज यांचा विचार करण्यास भाग पाडतो. आरक्षण हा उपकार नाही, तो ऐतिहासिक विषमतेवर मात करण्यासाठी स्वीकारलेला घटनात्मक उपाय आहे. तथापि, आरक्षणाची अंमलबजावणी, त्याचे लाभार्थी, आर्थिक व सामाजिक निकष आणि त्यासंबंधीचे धोरणात्मक प्रश्न यांवर विधायक चर्चा होणे आवश्यक आहे. चित्रपट या चर्चेला भावनिक आणि मानवी संदर्भ देतो. त्यामुळे आरक्षणाच्या प्रश्नाकडे केवळ राजकीय चष्म्यातून न पाहता, सामाजिक न्यायाच्या व्यापक चौकटीतून पाहण्याची गरज अधोरेखित होते.

चित्रपटातील एक महत्त्वाचा आशय म्हणजे जातीय ओळख आणि सामाजिक न्याय यांच्यातील संबंध. समाजात अनेकदा जात प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रता किंवा आर्थिक निकष यांच्या आधारे व्यक्तीचे मूल्यमापन केले जाते. मात्र, सामाजिक विषमतेचा अनुभव केवळ कागदपत्रांवरून समजत नाही. जात प्रमाणपत्र एखाद्या व्यक्तीची प्रशासकीय ओळख स्पष्ट करू शकते, परंतु सामाजिक न्यायाची हमी केवळ कागदपत्रांमधून मिळत नाही. सामाजिक सन्मान, समान संधी, भेदभावमुक्त वातावरण आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग या बाबीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. या वास्तवाकडे चित्रपट लक्ष वेधतो. जातीय पूर्वग्रह हा केवळ ग्रामीण किंवा पारंपरिक समाजव्यवस्थेपुरता मर्यादित नसून, आधुनिक शिक्षण संस्थेमध्येही वेगवेगळ्या स्वरूपात दिसू शकतो, हा विचार चित्रपट मांडतो.

ऋतुराज वानखेडे यांनी साकारलेली संघर्षशील व्यक्तिरेखा आणि पायल जाधव यांनी साकारलेली सामाजिक वास्तवाशी जोडलेली भूमिका कथानकाला भावनिक अधिष्ठान देतात. प्रियदर्शिनी इंदलकर यांच्या भूमिकेलाही कथानकात महत्त्वाचे स्थान आहे. विजय निकम, रोहिणी हट्टंगडी, देविका दप्तदार आणि अन्य कलाकारांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा चित्रपटातील सामाजिक संदर्भ अधिक ठळक करतात. या कलाकारांच्या अभिनयामुळे चित्रपटातील संघर्ष केवळ घोषणांमध्ये न राहता, मानवी अनुभवांच्या रूपात प्रेक्षकांसमोर येतो. दिग्दर्शक शैलेश नरवाडे यांनी विषयाच्या गांभीर्याला साजेसे कथानक उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. संवाद, प्रसंगरचना आणि सामाजिक प्रश्नांची मांडणी यांतून त्यांची विषयाशी असलेली बांधिलकी जाणवते. चित्रपटाच्या निर्मितीशी संबंधित मेलिओरिस्ट फिल्म स्टुडिओ आणि संगीतकार मंगेश धाकडे यांचे योगदानही या कलाकृतीच्या एकूण परिणामकारकतेच्या संदर्भात महत्त्वाचे ठरते.

सामाजिक विषमता, आरक्षण आणि जातीय वास्तव यांसारखे विषय पडद्यावर आले की, त्याभोवती वाद निर्माण होण्याची शक्यता असते. 'जयंती-२'च्या प्रदर्शनाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित किंवा काही हिंदू संघटनांकडून विरोध झाल्याचे दावे आणि चर्चा पुढे आल्याचे नमूद केले जाते. या विरोधामागे चित्रपटातील सामाजिक मांडणी, आरक्षणाविषयीचा दृष्टिकोन किंवा विशिष्ट सामाजिक संदर्भांबद्दलच्या आक्षेपांचा संबंध असल्याचे सांगितले जाते. मात्र या चित्रपटाला विरोध करणाऱ्या प्रत्येक संघटनेची अधिकृत भूमिका, त्यांची नेमकी मागणी आणि विरोधाची कारणे यांची स्वतंत्र व सर्वसमावेशक पुष्टी उपलब्ध स्रोतांवरून स्पष्ट होत नाही. त्यामुळे कोणत्याही संघटनेवर ठोस आरोप करण्यापूर्वी अधिकृत निवेदने आणि विश्वसनीय वृत्तांचा आधार घेणे आवश्यक आहे. तथापि, व्यापक प्रश्न मात्र महत्त्वाचा आहे. एखाद्या चित्रपटातील विचारांशी मतभेद असतील, तर त्यावर चर्चा, चिकित्सक समीक्षा, सार्वजनिक संवाद किंवा कायदेशीर मार्गांचा अवलंब करता येतो. मात्र चित्रपट प्रदर्शितच होऊ न देणे, कलाकारांवर दबाव आणणे किंवा प्रेक्षकांच्या अभिव्यक्ति स्वातंत्र्यावर मर्यादा आणण्याचा प्रयत्न करणे, हा लोकशाहीतील संवादाच्या संस्कृतीसमोरील गंभीर प्रश्न ठरू शकतो. चित्रपटाशी असहमती व्यक्त करण्याचा अधिकार जसा महत्त्वाचा आहे, तसाच चित्रपट पाहण्याचा आणि त्यावर स्वतंत्र मत बनविण्याचा प्रेक्षकांचा अधिकारही महत्त्वाचा आहे.

जातीय विषमता आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या कलाकृतींना विरोध होणे ही केवळ चित्रपटसृष्टीपुरती मर्यादित बाब नाही. अशावेळी प्रश्न असा उपस्थित होतो की, आपल्याला अस्वस्थ करणारा प्रश्न पडद्यावर दिसू नये असे वाटते की, त्या प्रश्नाचे वास्तवच बदलावे असे वाटते? समाजातील विषमता दूर करण्यासाठी केवळ घोषणांची नव्हे, तर आत्मपरीक्षणाची गरज आहे. शिक्षणसंस्थांमध्ये भेदभावाला स्थान नको असेल, तर संस्थात्मक पारदर्शकता, तक्रारनिवारण व्यवस्था, संवेदनशील प्रशासन आणि सामाजिक समतेची मूल्ये प्रत्यक्षात रुजवावी लागतील. 'जयंती-२' या चित्रपटाचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. तो प्रेक्षकांना एका विद्यार्थिनीच्या संघर्षाची कथा सांगतो, पण त्याच वेळी शिक्षणव्यवस्था, आरक्षण, जातीय ओळख आणि सामाजिक न्याय यांवर व्यापक विचार करण्याची संधी देतो.

सिनेमा हा केवळ मनोरंजनाचा पडदा नाही. तो समाजाचा आरसाही असतो आणि कधी कधी समाजाला स्वतःचा चेहरा दाखवणारा आरसाही ठरतो. 'जयंती-२' ही कलाकृती शिक्षणाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या सामाजिक वास्तवाकडे लक्ष वेधते. जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक पार्श्वभूमी कोणतीही असो, प्रत्येक विद्यार्थ्याला सन्मानाने शिक्षण घेण्याचा अधिकार मिळायला हवा. संविधानाने दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये केवळ पुस्तकांत न राहता, शिक्षणसंस्थांच्या दैनंदिन व्यवहारात उतरली पाहिजेत. कारण शिक्षणाच्या मंदिरात प्रवेश मिळणे ही पहिली पायरी आहे, पण तेथे माणूस म्हणून सन्मान मिळणे, ही खरी सामाजिक प्रगती आहे! 'जयंती-२'सारख्या चित्रपटांकडे केवळ कलाकृती म्हणून नव्हे, तर समाजाशी संवाद साधणाऱ्या माध्यमाच्या रूपात पाहिले पाहिजे. त्यातील विचारांशी सहमत असो वा असहमती असो, प्रश्नांपासून पळून जाण्याऐवजी त्यांच्यावर चर्चा करण्याची तयारी समाजाने दाखवली पाहिजे. सिनेमा थांबविण्यापेक्षा सामाजिक अन्याय थांबविण्याची मोहीम उभी राहिली, तरच शिक्षणाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या प्रत्येक 'जयंती'ला खऱ्या अर्थाने न्याय मिळेल!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी :**
**9923620919**

# देशाच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची - पालकमंत्री मेघना बोर्डीकर

## उत्कृष्ट शिक्षक, आयडॉल शिक्षक, विशेष शिक्षक, आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

हिंदु प्रकाश वार्ता /परभणी

**परभणी:** शिक्षकांनी केवळ कर्मचारी म्हणून काम न करता विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी अधिकाधिक वेळ द्यावा. देशाच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. या विकसित भारतासाठी सक्षम आणि गुणवंत विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

जिल्हा परिषद परभणीच्या शिक्षण विभागाच्या वतीने आज परभणी शहरातील अक्षदा मंगल कार्यालयात उत्कृष्ट शिक्षक, आदर्श शिक्षक, जि.प. आदर्श शाळा पुरस्कार आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्रीमती बोर्डीकर बोलत होत्या.

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्षा लता विजयकुमार वाकळे, अकोला येथील बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर , जिल्हा व ग्रामीण विकास यंत्रणा डॉ.स्मिता पाटील, जि.प. उपाध्यक्ष तथा बांधकाम सभापती श्रीकांत भोसले (विटेकर),जि.प. शिक्षण क्रीडा व आरोग्य सभापती वैशाली पंकज जाधव, जि.प. समाज कल्याण सभापती श्रीमती पार्वतीबाई मुंढे, जि.प.महिला व बालकल्याण सभापती श्रीमती ऐश्वर्या अजय चव्हाण , जि.प. कृषी व पशुसंवर्धन दुग्धशाळा सभापती श्रीमती कौशल्याबाई शिंदे,जि. प.मुख्य लेखा वित्त अधिकारी जनार्दन पक्वाने,उपमुख्य कार्यकारी अधिकारी चव्हाण जि.प.सदस्य सुचिता भरोसे, जोत्सना घाडगे , श्रीमती मनीषा पारवे ,रितेश काळे ,संग्राम जामकर ,डॉ. संजय रोडगे,पांडुरंग खिल्लारे , मुंजाभाऊ धोंडगे आदीसह सर्व जि.प.सदस्य यांची उपस्थिती होती.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, मराठवाड्यात गावागावांत उत्कृष्ट, आदर्श आणि सुंदर शाळांचे इन्फ्रास्ट्रक्चर उभारले जात आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता त्यांच्यातील कल्पकता आणि कौशल्य विकसित करण्यावर भर दिला जात आहे. स्किल इंडिया आणि नवीन शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यात उद्योजक बनण्यासाठीही प्रोत्साहन दिले जात आहे.



जिल्हा परिषदांच्या शाळांमधूनही गुणवंत विद्यार्थी घडत आहेत. त्यासाठी ग्रामस्थ आणि शालेय व्यवस्थापन समित्यांनी शाळांच्या विकासाकडे लक्ष द्यावे.

जिल्ह्यातील सुमारे ८० टक्के शाळांमध्ये डिजिटल लॅबची सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाकडून आवश्यक सोयी-सुविधा दिल्या जात आहेत.

शिक्षकांनी या सुविधांचा योग्य वापर करून ज्ञान, कौशल्य आणि संस्कारांनी परिपूर्ण विद्यार्थी घडविण्याचे काम करावे.

श्री. स्वामी म्हणाले की, शिक्षकांना देशाची उज्वल पिढी घडवण्याचे काम आणि गुरुचं गुरुजी पण सिद्ध करण्याचे काम करायचं आहे. आपली संस्कृती , परंपरा आणि महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजले पाहिजे. माझी शाळाच माझा धर्म, कर्म समजून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा संकल्प शिक्षकांनी केला पाहिजे. शिक्षकाशिवाय प्रगती होणार नाही. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या भविष्याचा वेध घेणारे शिक्षक व्हा.

कार्यक्रमात पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यावेळी जिल्ह्यातील दोन वर्षातील 18 उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, दोन विशेष शिक्षक पुरस्कार, 9 आयडॉल शिक्षक पुरस्कार , 9 आदर्श जिल्हा परिषद शाळा पुरस्कार आणि नवोदय एनएमएमएस शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रद्धा झिंझुर्के यांनी केले. सुत्रसंचलन प्रेमेंद्र भावसार, मयूर जोशी, ज्योत्स्ना पालमकर ,संतोष सेलुकर,सारिका गिरी यांनी तर आभार माध्यमिक शिक्षण अधिकारी डॉ. सविता बिर्गे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षणाधिकारी योजना संजय ससाने, उपशिक्षणाधिकारी गोविंद मोरे, शौकत पठाण , अब्दुल नजीब अब्दुल मुजीब , गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे ,उमेश राऊत,मुकेश राठोड,प्रगती नेवल,रोहिणी पवार ,शालिनी किरकन ,किरण सुरोडवार,सुभाष आम्ले,सुनील तोष्णीवाल,मंगेश नरवाडे , बी.व्ही. कापसिकर, पोले सर्व शिक्षण विस्तार अधिकारी ,अधिकारी व कर्मचारी आदीसह जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने परिश्रम घेतले.

**२७ शिक्षक पुरस्कार :** २ विशेष शिक्षक पुरस्कार; ९ आदर्श शाळा पुरस्कार

***विशेष शिक्षक पुरस्कार*** : श्रीमती राधा विलासराव भिसे जि.प.प्रा.शा.लोहरा, श्रीमती अर्चना अनंतराव भारस्वाडकर जि.प.प्रा.शा. साडेगाव *सन २०२५ चे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार*

श्रीहरी सुदामराव पवार (गंगाखेड), संजय वसंतराव पक्वाने (मानवत), निलेश कुमार मुंजाजी पांचाळ (सेलू), भागवत ज्ञानोबा पालमटे( पालम), खोब्राजी रामकिशन वाळवटे (परभणी), सुशीलकुमार सुधाकर वाघमोडे (सोनपेठ), मारोती भुजंगराव कदम (पूर्णा), सोपान नाथराव खताळ (जिंतूर ),पृथ्वीराज उत्तमराव धर्मे (पाथरी).

***सन २०२६ चे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार*** : दशरथ बाबुराव मुंढे (गंगाखेड), सुभाष हरिभाऊ सानप (जिंतूर ), गोपाळ रामराव गायकवाड (मानवत) , सतीश एकनाथराव कांबळे (पालम) , ज्ञानेश्वर विष्णू वाघमारे( परभणी) , भारत बाबुराव सावने (पाथरी) , बळीराम रामदास कदम( पूर्णा) , सदानंद शंकरराव देशमाने ( सेलू) , बाबासाहेब देविदासराव कराड (सोनपेठ),

***आयडॉल शिक्षक पुरस्कार*** : सुशील सुधाकर वाघमोडे (सोनपेठ), उमाकांत बाबुराव हाडूळे (मानवत) , पृथ्वीराज उत्तमराव धर्मे (पाथरी) , पप्रकाश मल्लिकार्जुन मोहकरे (मानवत) , काझी नसीरोद्दिन (सोनपेठ ), संजय वसंतराव पक्वाने(मानवत), रावसाहेब संभाजी उगले( पूर्णा), श्रीमती संचेती उमाकांत शेटे (परभणी) , माधव लिंबाजीराव गव्हाणे (सेलू )

# राष्ट्रीय संशोधनकार्यासाठी प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर यांना जीवनगौरव



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**शिर्डी :** माध्यम शिक्षण, पत्रकारिता, इतिहास संशोधन, पुरातत्त्वविद्या, पर्यटन, उदारकला आदी विविध क्षेत्रांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेल्या उल्लेखनीय संशोधनकार्याची दखल घेत प्रसिद्ध विचारवंत तथा माजी कुलगुरू प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रेडियंट टॅलेंट रेकॉर्ड्सच्या वतीने शिर्डी येथे आयोजित २६व्या अखिल भारतीय प्रतिभा संमेलन व राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शिर्डी येथील हॉटेल पासोच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनानी नरवीर तानाजी मालुसरे यांचे अकरावे वंशज सुभेदार कुणाल मालुसरे होते. छत्तीसगडचे शिक्षणतज्ज्ञ, रायपूर येथील कला विद्यापीठाचे संस्थापक तथा सहकार भारतीचे माजी अध्यक्ष डॉ. राकेश मिश्रा यांच्या हस्ते प्रा. डॉ. धारूरकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजक ॲड. क्रांती महाजन यांनी प्रास्ताविकातून आतापर्यंत आयोजित करण्यात आलेल्या २६ प्रतिभा संमेलनांचा आढावा घेतला. छत्रपती संभाजीनगर येथील प्रा. डॉ. पंढरीनाथ रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी भटिंडा (पंजाब) येथील सिंहब्रा, शिर्डीचे उद्योजक खंडेराव कडलक, अमरावतीचे उद्योजक राजाभाऊ उंबरकर, छत्रपती संभाजीनगरचे सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव राम रुळे, जयराज कुटे, डॉ. रामदास सपकाळ आदी उपस्थित होते.

**यावेळी प्रा. डॉ. धारूरकर यांनी लिहिलेल्या 'डॉ. हेडगेवार :** जीवन एवं कार्य' या ग्रंथाचे डॉ. राकेश मिश्रा यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. राष्ट्रीय पातळीवर कला, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, समाजसेवा आदी विविध क्षेत्रांत विधायक कार्य करणाऱ्या ३५ मान्यवरांनाही यावेळी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. समारंभात ॲड. क्रांती महाजन, डॉ. राकेश मिश्रा आणि प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर यांची भाषणे झाली. शेवटी सौ. रेखाताई पिंपराळे यांनी आभार मानले.

# अल्झायमरच्या लक्षणांकडे दुर्लक्ष नको; ज्येष्ठांना भावनिक आधार द्या

## स्मृतिभ्रंशाबाबत जनजागृती; आरोग्यदायी जीवनशैलीसह वेळेत वैद्यकीय सल्ल्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अल्झायमर किंवा स्मृतिभ्रंशाची लक्षणे दिसून आल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता वेळेत वैद्यकीय सल्ला घ्यावा. ज्येष्ठ नागरिकांची टिंगल किंवा उपेक्षा न करता त्यांना समजून घेऊन भावनिक आधार द्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. जागतिक अल्झायमर दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र, नागद (ता. कन्नड) येथे ज्येष्ठ नागरिक व नागरिकांमध्ये अल्झायमर आणि स्मृतिभ्रंशाबाबत जनजागृती करण्यात आली.



मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. लांडे यांनी अल्झायमरची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचारासाठी वेळेत सल्ला घेण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

अल्झायमर हा मेंदूवर परिणाम करणारा प्रगतिशील आजार असून, स्मरणशक्ती कमी होणे, विचार करण्याच्या क्षमतेवर परिणाम होणे, दैनंदिन कामांमध्ये अडचणी येणे, परिचित व्यक्ती किंवा ठिकाणे विसरणे आणि वारंवार तेच प्रश्न विचारणे अशी लक्षणे दिसू शकतात. अशी चिन्हे आढळल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

मेंदूचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, वाचन, बौद्धिक खेळ, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि सामाजिक संवाद महत्त्वाचा आहे. तसेच तंबाखू व मद्यपान टाळणे आणि रक्तदाब, मधुमेह यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कुटुंबीयांनी ज्येष्ठांना नियमित वेळ देऊन संवाद साधावा आणि त्यांच्या आरोग्याच्या तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असेही आवाहन करण्यात आले.

# शासकीय वसतिगृहाऐवजी स्वाधार योजनेचा अर्ज भरण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,** : परभणी जिल्ह्यातील अनुसूचित जाती/नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासकीय वसतिगृह उपलब्ध नाही, अशा तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहाऐवजी थेट स्वाधार योजनेचा अर्ज करता येतो, अशी माहिती सहाय्यक आयुक्त राजु एडके यांनी दिली आहे. परभणी जिल्ह्यातील पालम, सोनपेठ, पाथरी आणि जिंतूर या तालुक्यांमध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासकीय वसतिगृह उपलब्ध नाही. तसेच गंगाखेड तालुक्यात केवळ मुलींसाठी शासकीय वसतिगृह उपलब्ध आहे. त्यामुळे या चारही तालुक्यांतील विद्यार्थ्यांनी, तसेच गंगाखेड तालुक्यातील विद्यार्थ्यांनी (मुलांनी) शासकीय वसतिगृहाऐवजी थेट भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा अर्ज करणे आवश्यक आहे.

दरम्यान, काही विद्यार्थ्यांनी नजरचुकीने अन्य तालुक्यांतील शासकीय वसतिगृहांसाठी प्रवेश अर्ज सादर केले असल्याचे समाज कल्याण कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. संबंधित विद्यार्थ्यांच्या तालुक्यात शासकीय वसतिगृह उपलब्ध नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना त्या वसतिगृहात तांत्रिकदृष्ट्या प्रवेश देणे शक्य होणार नाही.

त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी ज्या शासकीय वसतिगृहाचा प्रवेश अर्ज भरला आहे, त्या वसतिगृहाच्या गृहपालांशी २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत संपर्क साधून अर्ज रद्द करण्यासाठी लेखी अर्ज सादर करावा. अर्जासोबत ऑनलाइन भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रत, आधार कार्डची प्रत आणि शैक्षणिक संस्थेचे मूळ बोनाफाईड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अर्ज रद्द झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत स्वाधार योजनेचा अर्ज भरता येणार आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत आवश्यक कार्यवाही करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त राजु एडके यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथे राममंदिर योद्धा श्रद्धेय अशोक जी सिंगल यांच्या स्मृती वंदन जनशताब्दी वर्षा निमित्त संत महंतांच्या उपस्थितीत सभेचे आयोजन : डॉ जीवन राजपूत

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद प्रतिनिधी :** विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून देशभर दि. २७ सप्टेंबरपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या जन्मशताब्दी वर्षात विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून संघटना व समाजामध्ये कार्य करणाऱ्या सेवकांना सोबत घेऊन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच हिंदू समाजासाठी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या सेवाभावी व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.



छत्रपती संभाजीनगर शहरात अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता, संत एकनाथ रंग मंदिर सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे "राममंदिर योद्धा स्मृती वंदन सभा"या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची स्वागत समिती गठित करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमासाठी विविध पंथ व संप्रदायातील प्रमुख मंडळी उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांचीही उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. हुकुमचंदजी सावला, अखिल भारतीय उपाध्यक्ष, विश्व हिंदू परिषद तसेच श्री क्षेत्र देवगड संस्थांना मठपती परम पूज्य भास्कर गिरी महाराज श्री क्षेत्र वेरूळ जगद्गुरु महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरी महाराज महंत अभयानंद गिरी महाराज कैलास आश्रम. सद्गुरु नाथ योगिनी अक्काताई महाराज नाथ अश्राम वेरुळ वामदेव तीर्थ टाका स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे . श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या कार्याचा इतिहास, त्यांचे योगदान आणि त्यांच्या कार्यातून मिळणारी प्रेरणा याविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमासाठी हिंदू समाजातील विविध धर्मगुरु, संत-महंत तसेच सर्व हिंदू बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागत समितीच्या वतीने डॉक्टर जीवन राजपूत. दयारामजी बसाया बंधू विजय दान कुंडे पाटील यांनी वेरूळ येथे ही माहिती दिली

# पूर्व जिल्हाध्यक्ष सुरेश बनकर यांचा गुलाबराव पाटील कोलते यांनी सत्कार केला



**सावळदबारा :** भारतीय जनता पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर पूर्व जिल्हाध्यक्षपदी सुरेश पांडुरंग बनकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सत्कार केला.

सोमवार दिनांक २१ सप्टेंबर रोजी सिल्लोड येथील भारतीय जनता पार्टी कार्यालयात भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी भाजपचे पूर्व जिल्हाध्यक्ष सुरेश बनकर यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला

यावेळी माजी सभापती अशोक दादा गरूड, दिलीप काका दाणेकर, किशोर जगताप, मंडळ अध्यक्ष एकनाथ हिवाळे आदी उपस्थित होते.

# एमजीएमचे प्रा. बैजू पाटील आंतरराष्ट्रीय पुरस्काराबद्दल सन्मानित

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ फोटोग्राफीचे विभागप्रमुख प्रा. बैजू पाटील यांना अमेरिकेतील इंटरनॅशनल अॅन्युअल फोटोग्राफी अवॉर्ड्समध्ये 'नेचर - वाइल्डलाइफ अँड ॲनिमल्स' या विभागात 'ऑनरेबल मेन्शन' हा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रा. बैजू पाटील यांच्या छायाचित्रण क्षेत्रातील योगदानाची दखल घेत महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि आमदार अनुराधा चव्हाण यांनी त्यांचे अभिनंदन केले. छत्रपती संभाजीनगर शहरासह ही बाब संपूर्ण देशासाठी अभिमानाची असल्याच्या भावना मान्यवरांनी यावेळी व्यक्त केल्या. एमजीएम विद्यापीठात काम करीत असताना कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर आणि अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांचे कायम मार्गदर्शन व माझ्या कामाला प्रोत्साहन मिळत असते. मला आंतरराष्ट्रीय स्तरावरील हा पुरस्कार मिळाला असला, तरी यामध्ये संस्थेचे मोलाचे सहकार्य राहिलेले आहे, अशी भावना प्रा. बैजू पाटील यांनी व्यक्त केली.

# लाभार्थ्यांच्या खात्यात दोन महिन्यांचा उदरनिर्वाह भत्ता जमा

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने शहरातील दिव्यांग बांधवांसाठी एक अत्यंत दिलासादायक पाऊल उचलण्यात आले असून, प्रशासनाकडून दिव्यांग लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांचा एकत्रित उदरनिर्वाह भत्ता थेट अदा करण्यात आला आहे. महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून, यामुळे हजारो गरजू दिव्यांगांना मोठा आर्थिक आधार मिळाला आहे.

या कल्याणकारी उपक्रमांतर्गत महानगरपालिकेकडून एकूण 1 कोटी 71 लाख रुपयांचा भरघोस निधी वितरित करण्यात आला आहे. या वितरित करण्यात आलेल्या निधीमध्ये दिव्यांग नागरिकांना नियमित दिला जाणारा उदरनिर्वाह भत्ता यासह विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिष्यवृत्तीचा देखील समावेश आहे. महापालिकेच्या या सर्वसमावेशक आणि संवेदनशील निर्णयामुळे शहरातील एकूण 7,753 लाभार्थ्यांना थेट फायदा झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

# पाथरीतील स्वर्णकार दुकानदाराची सात लाखाची फसवणूक; गुन्हा दाखल

**परभणी:-** परभणी जिल्ह्यात अनेक दिवसापासून आधुनिक तंत्रज्ञानाला बळी पडणारे आणखी अनेक प्रकरण घडत असतानाच पाथरी तालुक्यातही असाच प्रकार घडला पाथरी शहरातील जनता मार्केट मेन रोड भागात ज्वेलर्स चे दुकान चालवणाऱ्या एका व्यापाऱ्याचा मोबाईल हॅक करून पाच हजार तीनशे रुपये या रकमेची आर्थिक फसवणूक करण्यात आली याप्रकरणी अज्ञातावर माहिती व तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत पाथरी पोलिसात अन्सारी अब्दुल मुतलीफ यांनी तक्रार दिली सदरील फिर्यादीचे ज्वेलर्स चे दुकान असून अज्ञातानी त्यांच्या मोबाईल हॅक करून मोबाईल मधील इनफिलेक्स टीव्ही या नावाने अॅप डाऊनलोड करत वेगवेगळ्या खात्यातून सात लाख पाच हजार तीनशे रुपये काढून घेत फसवणूक केली. हा प्रकार दिनांक 16 सप्टेंबर एक ते दिनांक 19 सप्टेंबर घडला आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर अज्ञात विरोधात पाथरी पोलिसात तक्रार देण्यात आली आहे तपास पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे करत आहेत

# गणेशोत्सव पार्श्वभूमीवर सोयगाव शहरात पोलीसांचा रूट मार्च

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२१ सप्टेंबर - गणेशोत्सच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस तैनात झाले आहे त्यासाठी शहरात शांततेचे आवाहन करत सोमवार रोजी (दि.२१) ४ वाजता सोयगाव शहरातून एस आर पी एफ नागपूर पथकाद्वारे पोलीसांनी रूट मार्च काढला.यावेळी छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव,



अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी,उपविभागीय सिल्लोड विश्वजीत काईंगडे,यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील छत्रपती शिवाजी चौक,जूना बाजार पट्टा, सोयगाव बसस्थानक परिसर, व्यापारी गल्ली आदी भागातून सोयगाव पोलीसांचा रूट मार्च निघाला यावेळी गणेशोत्सव काळात शहर वासियांनी शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी केले

शहरातील विविध भागातून हा रूट मार्च काढण्यात आला होता यावेळी पोलीसांनी शहरातील गणेश भक्तांना शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. यावेळी पोलीस सफौ इसरार मिर्झा, दिपक फरकांडे, आकाश कुंडकर,ज्ञानेश्वर दांडगे,नारायण जिरी,गजानन दांडगे,अजय कोळी,पवन तायडे,सादिक तडवी,कुणाल जाधव,समाधान बारी, विजय शेजवळ, होमगार्ड आदींसह पोलीस कर्मचारी यांनी शहरातून रूट मार्च काढला होता.....

गणेशोत्सवा साठी सोयगाव शहरासोबत हद्दीतील गावात कडेकोट बंदोबस्त असून २४ तास पोलीस तैनात करण्यात आले आहे सध्या स्थानिक पोलीस ठाण्याचे दोन अधिकारी, १५ कर्मचारी व २८ गृहरक्षक दल याप्रमाणे शहर व हद्दीतील गावात बंदोबस्त तैनात करण्यात असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सांगितले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

## जाहीर सूचना / जाहीर खबर

सर्वसाधारण जनतेस याद्वारे जाहीर करण्यात येते की, मी खाली सही करणार **अनुज्ञा सतीश आखेगांवकर (ANUDNYA SATISH AAKHEGAONKAR)**, वय 25 वर्षे, रा. रंगारहट्टी, पैठण, जि. औरंगाबाद, महाराष्ट्र 431107, यांनी माझ्या नावातील इंग्रजी SPELLING मध्ये दुरुस्ती करून माझे नाव '**ANUDNYA SATISH AKHEGAONKAR**' असे केले आहे.

यापुढे सर्व शासकीय, निमशासकीय, शैक्षणिक, बँकिंग, पासपोर्ट तसेच इतर सर्व कायदेशीर व अधिकृत कागदपत्रांमध्ये मला '**अनुज्ञा सतीश आखेगांवकर (ANUDNYA SATISH AKHEGAONKAR)**' या नावाने ओळखण्यात यावे.

दिनांक: 22-09-2026

सही: **ANUDNYA SATISH AKHEGAONKAR**

## नमो चषक सब-ज्युनिअर सॉफ्टबॉल स्पर्धेला दिमाखात प्रारंभ
# 'या लहान खेळाडूंमधून उद्याचा मिल्खा सिंग घडू शकतो' : जितेंद्र जयस्वाल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशनच्या मान्यतेने शांतिनिकेतन विद्या प्रतिष्ठान, किणगाव आणि जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नमो चषक सब-ज्युनिअर सॉफ्टबॉल राज्यस्तरीय स्पर्धेला फुलंब्री येथील शांतिनिकेतन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मैदानावर उत्साहात सुरुवात झाली. राज्यातील विविध जिल्ह्यांतील मुला-मुलींच्या संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला आहे.



जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जयस्वाल आणि देवगिरी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणजी चव्हाण यांच्या हस्ते चेंडूला टोला मारून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जितेंद्र जयस्वाल यांनी, "या लहान खेळाडूंमधूनच उद्याचा मिल्खा सिंग होऊ शकतो. खेळाडूंना योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास ग्रामीण भागातूनही मोठे खेळाडू घडतील," असे मत व्यक्त केले.

उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य गोपाळराव वाघ, पंचायत समिती उपसभापती अश्विनीताई सोनवणे, फुलंब्री नगरपंचायतीचे गटनेते योगेश मिसाळ, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब तांदळे, देवगिरी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक गावंडे, राज्य संघटनेचे सचिव प्रदीप तळवलकर, गटशिक्षण अधिकारी क्रांती धसवाडीकर, गिरिजामाता विद्यालयाचे प्राचार्य भगत, शांतिनिकेतन विद्यालयाच्या प्राचार्या मंजुश्री खंडागळे आदी उपस्थित होते.

शांतिनिकेतन विद्यालय तसेच देवगिरी साखर कारखान्याच्या मैदानावर साखळी व बाद पद्धतीने सामने खेळविण्यात आले. पहिल्याच दिवशी मुलांच्या गटात नागपूर मनपाने छत्रपती संभाजीनगर मनपाचा ७-०, धाराशिवने लातूर मनपाचा १०-०, सांगलीने नाशिकचा ७-०, अहिल्यानगरने पुणे जिल्ह्याचा ४-१, कोल्हापूरने पीसीएमसीचा ३-१, तर लातूर जिल्ह्याने अमरावती मनपाचा ७-० असा पराभव केला.

मुलींच्या गटात सांगलीने गडचिरोलीचा ३-०, नागपूर मनपाने लातूर मनपाचा १०-०, कोल्हापूरने अहिल्यानगरचा ४-१, तर पुणे जिल्ह्याने नाशिकचा १०-० असा पराभव केला. उद्या बाद फेरीतील आणि अंतिम सामने होणार असून विजेत्यांना चषक व गौरव करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी गोकुळ तांदळे, एकनाथ ढोके, फकीरराव घोडे, सुरेश फुके, प्रशांत पांडे यांच्यासह पंच व अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते देवगिरी बँकेच्या गणरायाची आरती
## देवगिरी परिवारासाठी अभिमानाचा क्षण; गणेशोत्सवात भक्तिमय वातावरण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर** : देवगिरी बँक कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने आयोजित गणेशोत्सवात राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते श्री गणरायाची भक्तिभावाने आरती करण्यात आली. बँकेच्या वाटचालीशी असलेले बागडे यांचे जुने ऋणानुबंध आणि त्यांच्या हस्ते झालेली गणरायाची आरती यामुळे देवगिरी परिवारासाठी हा सोहळा विशेष ठरला.

हरिभाऊ बागडे यांनी एका छोट्या रोपट्याच्या रूपात स्थापन केलेल्या देवगिरी नागरी सहकारी बँकेचा आज विस्तार झाला आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्याच हस्ते गणरायाची आरती होणे हा देवगिरी परिवारासाठी अभिमानाचा आणि अविस्मरणीय क्षण ठरला.

आरतीप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत व्यवस्था प्रमुख पांडुरंग कुलकर्णी, देवजीभाई पटेल, अजय शहा, अभिषेक काठाळ, ललिताभाभी करवा, सी. एन. शर्मा, पदमसिंग राजपुरोहित, अंकित अग्रवाल, सुहास शिरसाठ, राजू शिंदे, राजू बागडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांच्यासह बँकेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि देवगिरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी श्री गणरायाचे दर्शन घेत आरतीमध्ये सहभाग नोंदविला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, भक्तिभाव आणि सांस्कृतिक परंपरेचा जागर करण्यात आला. यावेळी सर्वांच्या सुख-समृद्धी व मंगलमय भविष्यासाठी श्री गणरायाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

# आर्यनंदी कॉलनीत उत्तम शौच धर्माची भक्तिभावाने आराधना
## आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात विविध धार्मिक कार्यक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : दशलक्षण महापर्वानिमित्त आर्यनंदी कॉलनी येथे शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी उत्तम शौच धर्माची भक्तिभावाने आराधना करण्यात आली. परमपूज्य आचार्य श्री १०८ हेमसागरजी महाराज यांच्या मंगल सान्निध्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.महापर्वाच्या चतुर्थ दिवशी आचार्य हेमसागरजी महाराज यांनी उत्तम शौच धर्माचे महत्त्व विशद केले. मनाची शुद्धता, लोभाचा त्याग, संयम आणि आत्मकल्याणासाठी प्रयत्न करण्याचा संदेश त्यांनी दिला. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत धर्माराधना केली.यानिमित्त सकाळी ६ वाजता पंचामृत अभिषेक, ८ वाजता नित्यनियम पूजा आणि ८.३० वाजता आचार्यांचे मंगल उद्बोधन झाले. दशलक्षण महापर्वाचे सौधर्म इंद्र होण्याचा मान अनुप व सौ. मीना पाटनी परिवाराला मिळाला. शांतिधारेचा मान कांताबाई, भरतकुमार, राहुलकुमार, सौ. पूजा, देवांग, हर्ष, ईशान व समस्त ठोले परिवाराला मिळाला.पुष्पदंत भगवान यांच्या निर्वाणलाडूचा मान चपाबाई, अनुप, मीना, प्राजक्ता, शीतलकुमार, निहित, कु. दिशा व समस्त पाटनी परिवाराला मिळाला. तप, त्याग व संयमाचे अनुमोदन करून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.



# श्री साईबाबा मंदिर संस्थान ला तिर्थ क्षेत्राचा दर्जा देण्याकरिता भक्ताचे पालक मंत्र्यांना साकडे

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** :-गेली अनेक वर्षापासून "साईधाम "गंगाखेड रोड क्रांतीनगर परभणी येथे स्थित श्री साईबाबा मंदिर संस्थान अनेक भक्तांचे श्रद्धास्थान परिसरातील तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागातून भक्तांची गर्दी असते यातूनच या मंदिराला शासकीय सेवा सुविधा मिळवून देण्यासाठी तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची मागणी सर्व भक्तांनी दिनांक 17 सप्टेंबर गुरुवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमांतर्गत पालकमंत्री माननीय नामदार सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर निवेदन देण्यात आले.

श्री साईबाबा मंदिर संस्थान पन्नास वर्षांपासून साई धाम गंगाखेड रोड क्रांतीनगर येथे असून त् श्री साईबाबा मंदिर ची संकल्पना श्री साईबाबांचे निसिम भक्त साई दासानुदास साई सेवक ह भ प गुरुवर्य हिरानंद जी महाराज यांच्या संकल्पनेतून या मंदिर ची स्थापना करण्यात आली व भक्तांच्या नवसाला पावणारे साईबाबा अशी त्यांची व्याख्याईका आहे या मंदिर मध्ये दररोज चार आरत्या होतात तसेच वर्षाचे 12 महोत्सव होतात यामध्ये मुख्य श्रीराम नवमी पुण्यस्मरण महोत्सव गुरु पौर्णिमा दत्त जयंती आषाढी एकादशी कार्तिक एकादशी महाशिवरात्री यासारखे अनेक महोत्सव वर्षभरात चालत असतात दर गुरुवारी महाप्रसादाचा सोहळा असतो हे मंदिर शासनमान्य नोंदणी करत असून परभणी येथील धर्मदाय आयुक्त यांच्याकडे दिनांक 30/ 7/ 2007 ला मंदिर संस्थांचे मुंबई अधिनियम 1950 अन्वे नोंदणी करण्यात आली असून धार्मिक कार्यक्रम सामाजिक कार्यक्रम शैक्षणिक कार्यक्रम वृक्षारोपण रक्तदान शिबिर घेतले जातात या मंदिराचा विकास मोठ्या प्रमाणात होऊ शकला नाही म्हणून सर्व भक्तांनी मिळून पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांना साकडे यांना साकडे घातले व निवेदन दिले त्यांनी लवकरात लवकर या मंदिराचा कायापालट करून तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळून द्यावा अशी मागणी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्य साधून पालकमंत्र्यांना देण्यात आले यावेळी परभणी जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी माननीय संजय सिंह चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये मंत्री महोदयांना निवेदन देण्यात आले यावेळी श्री साईबाबा मंदिर संस्थानचे मुख्य विश्वस्त व श्री श्री 1008 महामंडलेश्वर श्री सच्चिदानंद सरस्वतीउर्फ डॉ अशोक पवार महाराज गो सेवा गो सेनेचे मराठवाडाकै छगन आप्पा जाधव चॅरिटेबल ट्रस्ट संस्थापक अध्यक्ष गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर गो शाळेचे संस्थापक संचालकमहाराष्ट्र राज्याचे मुख्य समन्वयक विजयकुमार खिस्ते पाटील मारोतराव महाराज झाडगावकर पाटील गो प्रेमी ज्ञानोबा माऊली कदम पाटील संचालक समूह सर्वांचे मुख्य समन्वय गोसेवक विजय जोगदंड व इतर साईभक्त यांनी मिळून हे निवेदन देण्यात आले. लवकरात लवकर तीर्थक्षेत्राचा दर्जा दिल्यास भक्तांना अनेक सुविधा उपलब्ध होतील त्यांचे गैरसोय होणार नाही याकडे पालकमंत्र्यांचे मंत्र्यांचे लक्ष वेधले होते.



# परभणी जिल्हा कोरडा दुष्काळ सर्व गोशाळांना चारा पाणी तात्काळ द्या अशी मागणी गोशाळा चालक समूह परभणी

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**Parb**:-गोशाळा चालक समूह परभणी जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या वतीने परभणी जिल्हाधिकारी साहेब यांना तसेच परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्याकडे मागणी परभणी जिल्ह्यातील सर्व गोशाळांना चारा पाणी तात्काळ देण्यात यासाठी निवेदन देण्यात आले वरील विषय अल- निनो सक्रियतेमुळे परभणी जिल्ह्यामध्ये कोरडा दुष्काळ झाला आहे आपणामार्फत आपत्ती व्यवस्थापना मधून तात्काळ सर्व गोशाळांना चारा व पाणी देणे बाबत हे निवेदन जिल्हाधिकारी साहेब तसेच परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांची भेट घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात दोघांनाही निवेदन देण्यात आले यांनी आश्वासन दिले लवकरच न्याय मिळेल सर्व गोशाळांना व चारा पाण्याची व्यवस्था करण्यात येईल वरील विषय अनुसरून विनंतीपूर्वक अर्ज करण्यात येते की यावर्षी मागील तीन महिन्यापासून पावसाळ्यात अत्यंल्प पाऊस पडल्यामुळे गोशाळा च्या वतीने लागवड केलेला चाऱ्याचे पावसाच्या पाण्याअभावी अत्यंत नुकसान झाले आहे जिल्हाभर चाऱ्याचा प्रश्न भेडसावणारा गंभीर झाला असून विहिरीचे तसेच बोरचे पाणी देखील आटले आहे त्यामुळे पशुधनाची उपासमारीची वेळ आली आहे तरीपण मै साहेबांना या दुष्काळाची परिस्थिती व शाळेतील गोधन गोशाळांना चाऱ्याची व टँकरने पाणीपुरवठा करावा आणि गोशाळांना परिसरातील चारा चारा छावणी उभारण्यासाठी मदत करावी जेणेकरून गो शाळेच्या परिसरातील पंचक्रोशीतील शेतकरी बांधवांच्या पशुधनाची गोवंशाची व्यवस्थापन करण्यास मदत होईल व पशुधनाचे संगोपन व संवर्धन करता येईल हे असा जिल्हाधिकारी व पालकमंत्र्यांकडे सकारात्मक निर्णय घ्यावा नम्र विनंती अशी मागणी१) हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे गोशाळा गोसंवर्धन पशु निवारा केंद्र ताडबोरगाव तालुका मानवत जिल्हा परभणी , २) देवकृपा गोशाळा मुरुंबा तालुका परभणी जिल्हा परभणी, ३) कृष्णा प्रिय गोशाळा झाडगाव, ४) कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी, ५) राजे मल्हार होळकर गोशाळा उमरवाडी गंगाखेड जिल्हा परभणी, ६) श्री गुरुवर्य रंगनाथ गुरुजी गोशाळा रूढी पाटी तालुका मानवत जिल्हा परभणी, ७) देवानंदजीकृपा गोशाळा इटोली तालुका जिंतूर जिल्हा परभणी,८) जय श्रीराम गोशाळा सायखेडा तालुका सोनपेठ जिल्हा परभणी, ९) जय भवानी गोशाळा पान्हेरा तालुका परभणी जिल्हा परभणी, १०) श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बोबडे टाकळी तालुका परभणी जिल्हा परभणी,११) श्री गोपाळ कृष्ण गोरक्षण संस्था मानवत तालुका मानवत जिल्हा परभणी, १२) जय बजरंग बली बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आडगाव तालुका जिंतूर जिल्हा परभणी, १३) श्री दत्त गोशाळा कोथाळा तांडा तालुका सोनपेठ जिल्हा परभणी,१४) शताक्षी गोशाळा नंदीशाळा, वांगी तालुका मानवत जिल्हा परभणी, १५) कामधेनु गोशाळा ग्रामीण प्रतिष्ठान उमरी तालुका जिल्हा परभणी, १६)पसायदान गोरक्षण संस्था रामेटाकळी तालुका मानवत जिल्हा परभणी, १७) स्व. संत गोविंद रामजी दादूपंथी मठ गोशाळा सेलु तालुका जिल्हा परभणी ,१८) पांडुरंग गोशाळा कौसडी तालुका जिंतूर जिल्हा परभणी ,१९)माता इंद्रायणी गोशाळा मानधने तालुका जिंतूर जिल्हा परभणी, २०) छत्रपती शिवाजी महाराज गोशाळा राणीसावरगाव तालुका गंगाखेड जिल्हा परभणी, २१) देवकीनंदन गोशाळा काकडे नगर परभणी, २२) नवोदय राम कृष्ण हरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था इटोली तालुका जिंतूर जिल्हा परभणी, २३) गोवर्धन गोवंश सेवा केंद्र शिरसम तालुका पालम जिल्हा परभणी ,२४) काऊकेअर फाउंडेशन टाकळी तालुका जिल्हा परभणी, २५) संत सोपान काका महाराज बनपिंपळा तालुका गंगाखेड जिल्हा परभणी, २६) मारुती मंदिर देवस्थान ब्रह्मकवाडी तालुका सेलू जिल्हा परभणी, २७) संत कोंडीबा महाराज सेवाभावी संस्था नारापूर तालुका पूर्णा जिल्हा परभणी, २८) जिजाऊ शैक्षणिक संस्था कामधेनु गोशाळा माटेगाव तालुका पूर्णा जिल्हा परभणी, २९) संत जनाबाई फाउंडेशन ओम नगर तालुका गंगाखेड जिल्हा परभणी, ३०) श्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गंगाखेड तालुका गंगाखेड जिल्हा परभणी.



# सोयगाव भाजपा शहर नवनियुक्त कार्यकारिणी पदाधिकारी यांचा सत्कार समारंभ सोहळा संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२१ सप्टेंबर

नुकत्याच जाहीर झालेल्या भारतीय जनता पार्टी सोयगाव शहर कार्यकारणी पदाधिकारी यांचा सत्कार समारंभ जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या निवासस्थानी माजी नगराध्यक्ष कैलास काळे व तेजस्विनीताई काळे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी भाजपा शहर अध्यक्ष मंगेश सोहनी,भाजपा शहर उपाध्यक्ष अतुल चौधरी,महेश मानकर,ॲड. शुभम आगे,विपीन काळे,सुनील इंगळे,मनोज चौधरी,प्रसाद पठाडे,

भाजपा शहर सरचिटणीस संजय मोरे,अजय पाटील,दिपक बनकर,भाजपा शहर चिटणीस गणेश गव्हांडे,ईश्वर परदेशी, आनिता तडवी,नाना घुले,अमोल कोरडे,सचिन देसले,मोर्चा आघाडे शहर अध्यक्ष मयूर मनगटे,सविताताई जावळे, गजानन देसाई,राहुल परदेशी,हरीश सोहनी,समाधान सोनवणे,कोषा अध्यक्ष निलेश नागपुरे,यावेळी जिल्हाचिटणीस सुनील गावंडे,प्रमोद पाटील,विजय गव्हाड, गजानन चौधरी व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. तर या निवड फेरनिवड झाल्याबद्दल पक्षाचे सर्व ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,मंत्री अतुल सावे,भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,जिल्हा अध्यक्ष सुरेश बनकर पाटील,ज्ञानेश्वर मोठे,सुनील मिरकर,जिल्हा सरचिटणीस सुनील गावंडे,सोयगाव शहर अध्यक्ष मंगेश सोहनी,कैलास काळे,वसंत आप्पा बनकर,राजेंद्र जावळे,प्रमोद पाटील,सुनील ठोंबरे,संजय मोरे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी नवीन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# जिंतूरमध्ये कारवाई; 'दोस्ती मित्र मंडळा'च्या क्लबवर धाड, 13.87 लाखांचा मुद्देमाल जप्त

**जिंतूर** : दि २० बेकायदेशीररीत्या सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर विशेष पोलीस पथकाने जोरदार कारवाई करत मोठा दणका दिला आहे. जिंतूर येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या 'दोस्ती मित्र मंडळ' क्लबमधील 'पफ्लू' नावाच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून पोलिसांनी ३८ आरोपींना निष्पन्न करत तब्बल १३ लाख ८७ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या धडक कारवाईमुळे जुगार चालकांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक (iGP) पथकाला जिंतूर परिसरात विनापरवाना बेकायदेशीर जुगार अड्डा सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने अचानक धाड टाकली. घटनास्थळी अनेक जण स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी 'पफ्लू' नावाचा पत्त्यांचा जुगार खेळताना व खेळवताना रंगेहात पकडले गेले.

या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे (दखलपात्र गुन्हा क्र. ५५०/२६, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४, ५, १२ (अ)). जिंतूर पोलीस ठाण्याचे अमोलकुमार सुभाषराव शिराळकर (वय ४४) यांनी दि १९ शनिवार रोजी सायंकाळी याबाबत फिर्याद दिली आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून लाखो रुपयांची रोख रक्कम, विविध कंपन्यांचे महागडे मोबाईल फोन आणि दुचाकी गाड्या जप्त केल्या आहेत.

**जप्त केलेल्या मुद्देमालाचा तपशील:**

**नगदी रक्कम व मोबाईल:** व्यवस्थापक परमेश्वर भुक्कर याच्याकडून रोख १,०२,४१० रुपये (५००, २००, १००, ५०, २० व १० रुपयांच्या नोटा) आणि १०,००० रुपयांचा विवो मोबाईल, असा एकूण १,१२,४१० रुपयांचा मुद्देमाल.

**इतर आरोपींकडून जप्त मोबाईल व वाहने:** शिवराम ठाकरे, नारायण राठोड, राजू घुगे, लक्ष्मण राठोड, ज्ञानदेव राठोड, सचिन राठोड, राजेश कावळे, भास्कर पवार, अर्जुन राठोड, दत्ता कुटे, गणेश सुरवसे, अमोल जाधव, रामेश्वर जाधव या आरोपींकडून सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचे विविध कंपन्यांचे (Vivo, Realme, Samsung, Oppo) मोबाईल जप्त करण्यात आले.

**जप्त दुचाकी गाड्या:**

**स्पलेंडर (MH 22 AL 5328) - किंमत रु. ४०,०००/-, होंडा शाइन (MH 22 AS 4596) - किंमत रु. ५०,०००/- युनिकॉर्न (MH 22 BF 7843) - किंमत रु. ७०,०००/- युनिकॉर्न (MH 22 BJ 3605) - किंमत रु. ७०,०००/- स्पलेंडर (MH 22 BA 3619) - किंमत रु. ४०,०००/- स्पलेंडर (MH 22 AY 2377) - किंमत रु. ४०,०००/- एकूण जप्त मुद्देमाल:** रु. १३,८७,८१०/-

**चौकट:**

'दोस्ती'च्या नावाखाली अवैध धंदा; ३८ आरोपींवर गुन्हा दाखल!

जिंतूर येथील 'दोस्ती मित्र मंडळ'च्या संस्थापक व व्यवस्थापकांसह एकूण ३८ आरोपींवर या कारवाईअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यामध्ये प्रवीण चव्हाण (रा. छत्रपती चौक), गजानन चुनडे (रा. ग्रीनपार्क), संतोष राठोड (चिंचोली), शंकर राठोड (चारठाणा), गजानन पालवी (नामदेव नगर), जीवन राठोड (रायखेडे), भारत दळवी (पिंपळगाव), बालाजी आहेर (संभाजीनगर), बबन राठोड (पुगळा), राजू राठोड (रावा), भाऊ आले (कोळदंडी), गुलाब कदम (आमदार कॉलनी), रमेश आठे (केहाळ तांडा), राहुल चव्हाण, रामराव जाधव, मनोज वरणकर, गणेश राठोड, गणपत राठोड, जनार्दन राठोड, गजानन कोकाटे (हिंगोली), प्रकाश जाधव, नागनाथ संगेकर यांच्यासह इतर आरोपींचा समावेश आहे.

सदर गुन्हा दाखल करण्याचे काम सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रत्ने यांनी केले असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इंगोले करत आहेत.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911